# <u>महत्वाची सुचना</u>

## Foundation Course for all Competitive Exams 2023-24

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेण्याऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षामध्ये यश संपादन करण्याच्या दृष्टीने स्पर्धा परिक्षाबद्दल मार्गदर्शन करण्याच्या हेतूने Foundation Course for all Competitive Exams 2023-24 हा उपक्रम मा. कुलगुरू महोदयाच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, कबचौउमवि, जळगाव तर्फे दिनांक २ नोव्हेंबर,२०२३ पासून सुरू करण्यात आला आहे.

या Foundation Course मध्ये एकूण ३०० तासिकाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमामध्ये विविध स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी आवश्यक असलेल्या (Foundation Course) पायाभूत अभ्यासक्रमावर आधारित एकूण ३०० मार्गदर्शन वर्गाचे आयोजन zoom या प्रणाली मार्फत ऑनलाइन मोड मध्ये आयोजन सुरू आहे. हा पायाभूत अभ्यासक्रम जळगावातील नामांकित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील तज्ञाच्या सल्ल्यानुसार तयार करण्यात आला आहे.

सदर उपक्रमाचे उद्घाटन प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, मा. कुलगुरू महोदय, कबचौउमवी, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली श्रीमान अंकितजी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांच्या शुभहस्ते दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ रोजी झाले. दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक २७ एप्रिल, २०२४ या कालावधीत एकूण १०५ तासिकाचे आयोजन करण्यात आले.

या मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेण्यासाठी कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यामध्ये, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठ परिसरातील प्रशाळेत प्रवेशीत किंवा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पात्र असतील. सदर मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेण्यासाठी रु. १००/- (रु शंभर मात्र) नाममात्र प्रवेश फी ऑनलाइन पेमेंट गेटवे च्या माध्यमातून स्वीकारण्यात येत आहे.
सदर मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेण्यासाठी खालील लिंक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
https://edu.easebuzz.in/signup/NORTHdcYJY/Registration_Form/?
प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील समन्वयकाशी संपर्क साधावा किंवा मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, कबचौउमवि, जळगाव यांचेशी ०२५७-२२५७४११ किंवा मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, कबचौउमवि, जळगाव यांचेशी ०२५७-२२५७४१८ / ४१९ या नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**सध्या कबचौउमवी, जळगावशी संलग्नीत महाविद्यलयामध्ये विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या एप्रिल / मे-२०२४ सत्र परीक्षा सुरु आहेत. सदर परीक्षांचे महत्व लक्षात घेऊन Foundation Course for all Competitive Exams 2023-24 <u>या उपक्रमाच्या तासिकाचे आयोजन दिनांक २९ एप्रिल, २०२४ ते २ जुलै २०२४ या कालावधीत करण्यात येणार नाही.</u>**

**सदर तासिकाचे नियमित आयोजन दिनांक <u>३ जुलै २०२४</u> पासून करण्यात येईल, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

संचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
कबचौउमवि, जळगाव.